**सं.फौ.ख.क्र. २७४/२०१५**
**सरकार-वि- रविंद्र**
**निशाणी क्र. १७**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ यांची साक्ष.**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

**नाव** - चेतन देवराव मलेवार

**वय** - ३० वर्ष, **व्यवसाय** - नोकरी

**पत्ता** - पिपळा डाग बंगला, तह. सावनेर, जि. नागपूर.

**सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. एच.ए. डेकाटे यांच्यामार्फत.**

घटना दि. २८.०२.२०१५ रोजी दुपारी १२.३० वाजताच्या दरम्यान चनकापूर, अन्ना मोड, मुन्ना गॅरेज जवळ घडली. मी माझ्या बाईक क्र. एम. एच. ३१ सी. झेड. ७०३१ ने जात होतो. माझ्या सोबत माझी ताई पिंकी देवराव मलेवार होती. खापरखेडावरून पिपळा डाग बंगला येथे जात होतो. समोरची कार हिने अचानक इंडिकेटर न देता राईट टर्न मारला व थांबली. त्यामुळे माझी बाईक कारला धडकली व गाडी पलटी झाली. मी व माझी बहिण गाडीवरून खाली पडलो. त्यामुळे माझ्या दोन्ही हाताला, पायाला, कंबरेला व खांद्याला लागले. माझ्या ताईला डोक्याला, हाताला व छातीला लागले. मी माझ्या ताईला जवळच्या शांती हॉस्पीटलला घेवून गेलो व माझ्या मित्र सुरेंद्र कोठारीला फोन केला. माझ्या मित्र आल्यावर ताईला घेवून वलनी हॉस्पीटलला गेलो. पोलीसांनी माझे बयाण घेतले. मी आरोपीला ओळखत नाही कारण १० वर्षे झाली.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. पी. वाय. मनपे यांचेमार्फत**

**२.** हे म्हणणे खरे आहे की, मला गाडीचा क्रमांक आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, गाडी कोण चालवत होते हे मला माहित नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,
समक्ष,

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2026.04.21 15:47:04 +0530

सावनेर,
दिनांक २१.०४.२०२६

(एस. एम. गाडे)
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
(न्यायालय क्र.०३) सावनेर

सं.फौ.ख.क्र. २७४/२०१५
सरकार-वि- रविंद्र
निशाणी क्र. १७

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- D. R. Aglawe